**श्री पी.जी. राहूरकर, भा.व.से. यांना**
**मुख्य वन संरक्षक पदावरील पदोन्नतीसाठी**
**मानीव दिनांक देण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन आदेश क्रमांक : आयएफएस-२०१७ / प्र.क्र. २९० / फ-७**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २३ ऑक्टोबर,२०१७

**वाचा :** १) दि. ९ मार्च,२०१६ व दि.१० मार्च,२०१७ रोजी च्या मुख्यवनसंरक्षक पदावरील पदोन्नतीबाबत पदोन्नती छाननी समितीचे इतिवृत्त
२) शासन आदेश, महसूल व वन विभाग,क्र. आयएफएस २०१७/प्र.क्र. ८२/फ-७, दि. ६.४.२०१७
३) शासन आदेश महसूल व वन विभाग,क्र. एएफओ १३१६/ प्र.क्र. १३८/ फ-७, दि. १२.५.२०१७
४) शासन आदेश महसूल व वन विभाग,क्र. आयएफएस २०१७/प्र.क्र. ८२/फ-७, दि. २१.६.२०१७

**शासन आदेश :-**

श्री प्रदिपकुमार जी. राहुरकर, भावसे यांच्या विरुध्द अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपील) नियम १९६९ च्या नियम ८ नुसार शिस्तभंग विषयक कारवाई सुरु करण्यात आली होती. श्री राहुरकर, भावसे यांच्याविरुध्द सुरु करण्यात आलेली विभागीय चौकशीची कार्यवाही संदर्भ क्रमांक ३ येथील दि. १२.५.२०१७ च्या आदेशान्वये संपुष्टात आलेली आहे.

२. दिनांक ९.३.२०१६ रोजी मुख्य वनसंरक्षक पदावरील पदोन्नतीकरीता आयोजित करण्यात आलेल्या पदोन्नती समितीच्या बैठकीत श्री राहुरकर, भावसे यांना पात्र ठरविण्यात आले आहे. तथापि त्यांच्या विरुध्द सुरु असलेल्या विभागीय चौकशीच्या अनुषंगाने त्यांचे पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत. विभागीय चौकशीची कार्यवाही संपुष्टात आल्यानंतर श्री राहुरकर यांना शासन आदेश दि. २१.६.२०१७ अन्वये पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली आहे.

३. श्री राहुरकर, भावसे यांचे निकटचे कनिष्ठ अधिकारी श्री डब्ल्यु.आय.यटबॉन भावसे यांना दि. ६.४.२०१७ च्या शासन आदेशान्वये मुख्य वनसंरक्षक या पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

४. सबब, श्री राहुरकर, भावसे हे मुख्य वनसंरक्षक पदाकरीता पदोन्नतीसाठी पात्र असल्याने, श्री. राहुरकर यांना त्यांच्या निकटचे कनिष्ठ अधिकारी श्री डब्ल्यु.आय.यटबॉन, भावसे यांचा मुख्य वनसंरक्षक पदाचा पदोन्नतीचा दिनांक मानीव दिनांक म्हणून पूर्वलक्षी प्रभावाने खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदोन्नतीचे पद | वेतनश्रेणी | निकटतम अधिकाऱ्याचे नाव/ पदोन्नतीचा दिनांक | पदोन्नतीच्या पदाचा मंजूर करण्यात येत असलेला मानीव दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्य वनसंरक्षक | सातव्या वेतन आयोगात लेव्हल १४ | श्री डब्ल्यु.आय.यटबॉन दि. ६ एप्रिल,२०१७ | दि. ६ एप्रिल,२०१७ |

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१०२३१२३४५७३४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2017.10.23 12:24:34 +05'30'

**( वीरेंद्र तिवारी )**
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

**प्रति :**

श्री पी.जी.राहुरकर, भा.व.से., महाव्यवस्थापक, उत्तर चंद्रपूर प्रदेश महाराष्ट्र वन विकास महामंडळ, चंद्रपूर

**प्रत :**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
७. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक),नागपूर
८. महालेखापाल , १ / २- (लेखापरिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/ नागपूर
९. सहायक संचालक, भावसे लेखा विभाग, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.निवड नस्ती/ वैयक्तिक नस्ती